राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

निवडणूक तात्काळ
फॅक्स

क्रमांक : रानिआ/ग्रापनि/२०१०/सं.क्र.१४६७/का.८
नविन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १६/५/२०११

प्रति,

जिल्हाधिकारी (सर्व )

विषय :- माहे जुलै ते डिसेंबर २०११ या कालावधीत मुदतीत संपणा-या ग्रामपंचायतीबाबत नव्याने आरक्षण व सोडत बाबतचा कार्यक्रम.

संदर्भ :- या कार्यालयाचे क्रमांक/रानिआ/ग्रापनि/२०११/प क २/का-८ दि.१३/५/२०११ चे पत्र.

महोदय,

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम १९ दिनांक २१ एप्रिल २०११ अन्वये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम १० (२ ) मधील खंड (ब), (क), (ड) मध्ये सुधारणा करण्यात आली असून स्त्रियांकरिता ग्रामपंचायतीच्या एकूण जागांच्या १/२ जागा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरीकांचा मागासवर्गाच्या प्रवर्गामधील स्त्रियांकरिता राखून ठेवलेल्या जागा धरुन) स्त्रियांसाठी राखून ठेवण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

माहे जुलै ते डिसेंबर २०११ मध्ये मुदतीत संपणा-या ग्रामपंचायतीच्या दिनांक १६.११.२०१० रोजीच्या पत्रान्वये दिनांक २८.१२.२०१० रोजी नमुना अ प्रसिध्दीने प्रभाग रचना आरक्षणाबाबतचा कार्यक्रम पार पडला आहे . दिनांक १३.५.२०११ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशानुसार स्त्रियांकरिता ५०% जागा राखून ठेवण्याकरिता करावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आलेली आहे .

याबाबत काही जिल्हाधिकारी कार्यलयाकडून विचारण्यात आलेल्या शंकाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करण्यात येत आहे .

**दिनांक १३.५.२०११ च्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे या आदेशानंतर होणारी सार्वत्रिक निवडणूक ही फक्त स्त्रियांच्या आरक्षणाकरिता पहिली निवडणूक समजण्यात येईल. अर्थात यापूर्वीच्या दिनांक १६.११.२०१० च्या आरक्षणाच्या कार्यक्रमानुसार करण्यात आलेली प्रभाग रचना व अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागारीकांचा मागास प्रवर्ग यांच्या आरक्षणामध्ये व चक्रानुक्रमे दिलेल्या जागांमध्ये कोणताही बदल होणार नाही. फक्त या सर्व वर्गवारीमधील स्त्रियांकरिता यापूर्वी १/३ (एक तृतियांश) जागा राखून ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याऐवजी १/२ (एक द्वितियांश) जागा आरक्षित करण्याकरिता नव्याने सोडत काढण्यात येईल.**

मा. राज्य निवडणुक आयुक्त यांच्या आदेशान्वये,

(प्राजक्ता भोसले)
उप आयुक्त,
राज्य निवडणुक आयोग,महाराष्ट्र